**जिल्हा परिषद सांगली**

**बांधकाम विभाग जिल्हा परिषद सांगली**

**ई निविदा कार्यप्रणाली - टिपणी**

---

सांगली दि. ७/०१/२०१२:- शासनाचे ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७ मंत्रालय मुंबई दि.१९/१०/२०११ जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील रु.५ लक्ष पेक्षा जास्त रक्कमेची कामे दि. ०१/०१/२०१२ पासून ई निविदा पध्दतीने करणे बाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सध्याची प्रचलीत निविदा पध्दतीचा वापर न करता ई निविदा कार्यप्रणालीचा उपयोग करणे कामी शासनाने ई- निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्यासाठी नॅशनल इन्फर्मेटिक्स सेंटर,महाआफनलाईन कडील समन्वय अधिकारी म्हणून श्री शफि सय्यद, उपअभियंता,प्रमंग्रासयो,पुणे यांची निवड केली असून या संस्थेमार्फत सांगली जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत ठेकेदारांची मार्गदर्शनपर कार्यशाळा मंगळवार दि. १७/०१/२०१२ रोजी घेऊन प्रशिक्षित केलेले आहे.

ई- निविदा कार्यप्रणालीमुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील रु.५ लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या कामांची निविदा करणे सुलभ व सोयीस्कर झालेमुळे निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण केली जाते.तसेच ई निविदामुळे निविदा कामाकाज संगणकावर करणे सुलभ व सोयीस्कर झालेले आहे.तसेच कामकाज जलद गतीने होऊन कामकाजात पारदर्शकता निर्माण झालेली आहे.

**कार्यकारी अभियंता (इवद)**

**जिल्हा परिषद, सांगली**